RNI No. MAHBIL /2009/29236

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## भाग एक-मध्य उप-विभाग

वर्ष १२, अंक २९] गुरुवार ते बुधवार, जुलै १६-२२, २०२६/आषाढ २५-३१, शके १९४८ [पृष्ठे ८, किंमत : रुपये १६.००

### प्राधिकृत प्रकाशन

**शासकीय अधिसूचना, नेमणुका इत्यादी**

### विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक २६ मे २०२६.

**अधिसूचना**

क्रमांक एजीपी-२०२५/प्र.क्र. १५५/का.१४.—दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या ऑर्डर २७, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १८ (१) व महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ च्या नियम १३ तसेच या नियमात शासन अधिसूचना विधि व न्याय विभाग क्र. संकीर्ण- ५९१५/(२७)/का.१४, दि. ०३.०२.२०१५ व दि. १३.०२.२०१५ च्या शुद्धिपत्रकान्वये करण्यात आलेल्या दुरुस्तीस अनुसरुन तसेच शासन निर्देशानुसार जिल्हा न्यायालय, नागपूर येथे ॲड. निलेश लटी यांची “सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता” या पदावर आदेशाच्या दिनांकापासून पुढील दोन वर्ष अथवा पुढील आदेशापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर नियुक्ती महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहील.

३. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरूस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

४. जिल्हा सरकारी वकील कार्यालय, नागपूर यांनी उपरोक्त प्रमाणे नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या विधि अधिकाऱ्यांचा रुजू अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. कुँवरसिंह राजबहादूरसिंह सिंघेल,**
शासनाचे उप विधि सल्लागार-नि-उप सचिव.

## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक २५ मे २०२६.

### अधिसूचना

क्रमांक एजीपी-२०२६/प्र.क्र. ५४/का. १४.—दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ च्या ऑर्डर २७, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १८ (१) व महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ च्या नियम १३ तसेच या नियमात शासन अधिसूचना विधि व न्याय विभाग क्र. संकीर्ण - ५९१५/(२७)/का.१४, दि. ०३.०२.२०१५ व दि. १३.०२.२०१५ च्या शुद्धिपत्रकान्वये करण्यात आलेल्या दुरुस्तीस अनुसरुन तसेच शासन निर्देशानुसार मा. मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा येथे ॲड. युगंधरा अजय खानविलकर यांची “सहायक सरकारी वकील” या पदावर आदेशाच्या दिनांकापासून मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील सहायक सरकारी वकील / अतिरिक्त सरकारी वकील / सहायक सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता/ अतिरिक्त सरकारी वकील व अतिरिक्त सरकारी अभियोक्ता या कंत्राटी पदासाठीच्या नवीन नियुक्ती प्रक्रियेचा निकाल जाहीर होईपर्यंत अथवा पुढील आदेशापर्यंत यापैकी जे अगोदर घडेल तोपर्यंतच्या कालावधीकरीता नियुक्ती करण्यात येत आहे.

२. सदर नियुक्ती महाराष्ट्र विधि अधिकारी (नियुक्ती, सेवेच्या शर्ती आणि मानधन) नियम १९८४ यामध्ये दिलेल्या सेवाशर्तीच्या अधीन राहील.

३. वरील आदेश मागे घेण्याचा/त्यात दुरूस्ती करण्याचा/ते रद्द करण्याचा अधिकार शासन राखून ठेवीत आहे.

४. सरकारी वकील कार्यालय, मा. मुंबई उच्च न्यायालय, मूळ शाखा यांनी उपरोक्त प्रमाणे नव्याने नियुक्त करण्यात आलेल्या विधि अधिकाऱ्यांचा रुजू अहवाल शासनास तात्काळ सादर करावा.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. कुँवरसिंह राजबहादूरसिंह सिंघेल,**
शासनाचे उप विधि सल्लागार-नि-उप सचिव.

---

## विधि व न्याय विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक १८ जून, २०२६.

### अधिसूचना

क्रमांक इएसटी २०२६/प्र.क्र. ७८/का. २.—सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक १८.०५.२०२६ च्या अ.शा.पत्रान्वये व या विभागाच्या दिनांक २०.०५.२०२६ रोजीच्या कार्यालयीन आदेशान्वये निवडसूची वर्ष २०२५-२०२६ श्रीमती सुप्रिया श्रीकर धावरे यांची सचिव (विधि विधान) (एस- ३०) या संवर्गामधील नियमित पदोन्नतीच्या कोट्यातील रिक्त पदावर निव्वळ तातुपरत्या दिनांक ०१.०५.२०२६ (म.पू.) पासून पदोन्नतीने पदस्थापना केलेली आहे.

०२. आता, निवडसूची वर्ष २०२५-२०२६ मध्ये, वेतन स्तर एस-३० रु.१,४४,२००-२,१८,२०० या वेतनश्रेणीतील सचिव (विधि विधान) या संवर्गातील नियमित पदोन्नती कोट्यातील रिक्त पदावर मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्र.२८३०६/२०१७ मधील अंतिम निर्णयाच्या अधीन राहून श्रीमती सुप्रिया श्रीकर धावरे यांची दि.०१.०५.२०२६ (म.पू.) पासून निव्वळ तातुपुरत्या स्वरुपात देण्यात आलेली पदोन्नती शासन मान्यतेने दि.०१.०५.२०२६ ( म.पू.) पासून नियमित करण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**दिलीप घुमरे,**
शासनाचे प्रधान सचिव व विधि परामर्शी.

# जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे कार्यालय

## आदेश

क्रमांक वि-१/श्री.साईसमर्थनापत/अधि./कर्म./क.१५६/अधि.प्रदान/२०२६/२७३९.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ ( १ ) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, संदिप जाधव, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक या आदेशान्वये श्री साई समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नाशिक, रविकिरण अपार्टमेंट, शॉप नं. १,२,३ सावतानगर, सिडको, नविन नाशिक, ता. जि. नाशिक या संस्थेचे खालील अधिकाऱ्यांना त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२७ (फेर नियुक्ती) या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ. क्र. (१) | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव (२) | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा (३) | शक्तीची व्याप्ती (४) | कार्यक्षेत्र (५) |
|---|---|---|---|---|
| १ | श्री. प्रथमेश अंकुश बोरसे | वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | संस्थेच्या कार्यक्षेत्रापुरते |

**टीप.—**

(१) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

(२) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

(३) वसुली अधिकारी यांनी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक जा. क्र. पतसंस्था /सआ-५ खर्च/ वसुली आदेश / २०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १,२,३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती या कार्यालयास सादर करावी.

(४) या कार्यालयाने अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

(५) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाही.

(६) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

(७) **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी (महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये) " असे लिहावे.

(८) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर "**वसुली अधिकारी, श्री साई समर्थ नागरी सहकारी पतसंस्था मर्या. नाशिक, रविकिरण अपार्टमेंट, शॉप नं. १,२,३ सावतानगर, सिडको, नविन नाशिक, ता. जि. नाशिक** " असा फलक लावता येईल.

(९) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/ जामिनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजीचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(११) वसुली अधिकाऱ्याने मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ व दिनांक ११ जुलै २०१९ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. पतसंस्थेच्या चेअरमन/व्यवस्थापक/ अवसायक यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्याच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/ आदेश/ घोषणापत्र यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१३) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ मॅनेजर/ व्यवस्थापक/ अवसायक यांनी प्रपत्र ४ मध्ये वसुली अधिकारीनिहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास सादर करावा.

(१४) सर्व प्रकरणामध्ये जंगम जप्ती, स्थावर जप्ती, अपसेट प्राईज मंजुरी, जाहीर लिलाव व कलम १००/८५ अन्वयेची कार्यवाही ही नियमानुसार विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी. विहित मुदतीत उक्त कार्यवाही पूर्ण न केल्यास आपणांस दिनांक १ एप्रिल २०२७ पासून पुढील कालावधीसाठी कलम १५६ चे अधिकार प्रदान करण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

नाशिक,
दिनांक १८ मे २०२६.

**संदिप जाधव,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, नाशिक.

# जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक यांचे कार्यालय

## आदेश

क्रमांक वि-१/सिन्नरनापत/अधि./कर्म./क.१५६/अधि.प्रदान/सन २०२६/२२४७.—महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ ( १ ) अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या शक्तीचा वापर करून मी, फयाज मुलाणी, जिल्हा उप निबंधक, सहकारी संस्था, नाशिक या आदेशान्वये सिन्नर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक ( अवसायनात ) या संस्थेचे खालील अधिकाऱ्यांना त्यांचे नावापुढे दर्शविलेल्या कार्यक्षेत्रासाठी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १०१ व कलम ९१ अन्वये प्राप्त झालेल्या वसुली प्रमाणपत्राची अंमलबजावणी/कर्ज वसुली करण्याकरिता महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ (१) व नियम १०७ अनुसार मालमत्ता जप्त करून व तिची विक्री करून रकमा वसूल करण्याचे निबंधकाचे अधिकार, खालील अटीस अधिन राहून या आदेशाच्या दिनांकापासून ते दिनांक ३१ मार्च २०२७ ( फेर नियुक्ती ) या कालावधीकरिता प्रदान करीत आहे :—

| अ. क्र. | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचे नाव | अधिकार प्रदान केलेल्या अधिकाऱ्याचा हुद्दा | शक्तीची व्याप्ती | कार्यक्षेत्र |
|---|---|---|---|---|
| (१) | (२) | (३) | (४) | (५) |
| १ | श्री. अजय भिला शेंडे | वसुली अधिकारी | वसुली अधिकारी | नाशिक जिल्हा |

**टीप.—**

( १ ) वसुली अधिकारी यांनी महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० चे कलम १५६ व नियम, १९६१ चे नियम १०७ मधील तरतुदीनुसार कर्ज वसुलीची कार्यवाही करावी. कर्ज वसुली करताना सहकार कायदा, नियम यातील तरतुदी व परिपत्रकीय सूचनांचे पालन न केल्याचे निदर्शनास आल्यास आवश्यक ती चौकशी करून आवश्यकता भासल्यास सदरचे अधिकार तात्काळ काढून घेण्यात येतील.

( २ ) सदरचे अधिकार सहकार कायदा कलम १०१ व ९१ अन्वये प्राप्त वसुली दाखल्याची अंमलबजावणी करण्याकरिता असतील.

( ३ ) वसुली अधिकारी यांनी मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचेकडील परिपत्रक जा. क्र. पतसंस्था /सआ-५ खर्च/ वसुली आदेश / २०१८, दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ रोजी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार दरमहा सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात प्रपत्र १,२,३ व ५ प्रमाणे कर्ज वसुलीची माहिती या कार्यालयास सादर करावी.

( ४ ) या कार्यालयाने अधिकार प्रदान केलेल्या वसुली अधिकारी असलेल्या व्यक्तीची बदली झाल्यास किंवा सेवानिवृत्ती झाल्यास किंवा सेवेतून काढून टाकल्यास किंवा त्याचा मृत्यू झाल्यास, अशा अधिकाऱ्यास प्रदान केलेले अधिकार आपोआप रद्द होतील.

( ५ ) वसुली अधिकारी यांनी नमूद केलेल्या कालावधीत वसुलीचे कामकाज समाधानकारक केले नसल्याचे निदर्शनास आल्यास किंवा प्रदान केलेल्या अधिकाराचा गैरवापर करीत असल्याचे निदर्शनास आल्यास, प्रदान केलेले अधिकार काढून घेतले जातील व भविष्यात असे कोणतेही अधिकार अशा व्यक्तीस प्रदान करण्यात येणार नाही.

( ६ ) शासन निर्णय क्रमांक संकीर्ण-१५०४/प्र.क्र. २३१/१५-स, दिनांक २३ नोव्हेंबर २००६ अन्वये विशेष वसुली अधिकाऱ्यांना तीन सिंहाच्या राजमुद्रेचा वापर करता येणार नाही.

( ७ ) **वसुली अधिकाऱ्यास त्याच्या नावापुढे कोठेही " महाराष्ट्र शासन नियुक्त " आणि किंवा " सिव्हील कोर्ट " " एक्झीक्युटीव्ह कोर्ट " या शब्दांचा अथवा तत्सम शब्दांचा वापर करता येणार नाही.** त्याऐवजी वसुली अधिकाऱ्यांनी त्यांच्या नावापुढे " वसुली अधिकारी ( महाराष्ट्र सह. संस्था अधिनियम, १९६० व नियम, १९६१ चे नियम १०७ अन्वये ) " असे लिहावे.

( ८ ) वसुली अधिकाऱ्यास वसुलीसाठी वापर करण्यात येणाऱ्या वाहनावर " **वसुली अधिकारी, सिन्नर नागरी सहकारी पतसंस्था मर्या. सिन्नर, ता. सिन्नर, जि. नाशिक ( अवसायनात )** " असा फलक लावता येईल.

(९) वसुली अधिकाऱ्याने पगार जप्तीची कार्यवाही करताना कर्जदाराच्या/ जामिनदाराच्या पगार कपातीबाबत राष्ट्रीयीकृत बँका वा अन्य बँका यांचेकडे परस्पर वेतन कपातीचा आदेश देऊन परस्पर पगार कपात करता येणार नाही. संबंधित कर्जदार/जामीनदार ज्या आस्थापनेवर काम करीत आहे त्या आस्थापनेवरील आहरण व संवितरण अधिकारी / पगार करणारा अधिकारी यांचेमार्फत पगारातून कर्ज वसूल करण्याची कार्यवाही करावी.

(१०) वसुली अधिकाऱ्यास, थकबाकीदाराकडून वसुली दाखल्यानुसार वसूलपात्र रक्कम व मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे दिनांक ६ एप्रिल २०१८ रोजीचे आदेशामध्ये निश्चित केलेल्या दराने वसूल करावयाची रक्कम याशिवाय इतर कोणतीही रक्कम करता येणार नाही. सदर खर्चाची आकारणी व विनियोग याबाबत प्रकरणनिहाय हिशोब ठेवावयाचा असून त्याची तपासणी संस्थेच्या वैधानिक लेखापरीक्षकांकडून करून घ्यावयाची आहे.

(११) वसुली अधिकाऱ्याने मा. सहकार आयुक्त व निबंधक, सहकारी संस्था, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयाच्या दिनांक ३१ ऑक्टोबर २०१८ व दिनांक ११ जुलै २०१९ च्या परिपत्रकातील सूचनांची काटेकोरपणे अंमलबजावणी करावी. सदर परिपत्रकातील सूचनांचे उल्लंघन झाल्यास वसुलीचे अधिकार काढून घेण्यात येऊन भविष्यकाळात असे अधिकार प्रदान केले जाणार नाहीत याची नोंद घ्यावी. पतसंस्थेच्या चेअरमन/व्यवस्थापक/ अवसायक यांनी दरमहा वसुली अधिकाऱ्याच्या कामकाजाचा कर्जदारनिहाय आढावा परिपत्रकातील प्रपत्र पाचमध्ये नमूद केल्याप्रमाणे घ्यावा.

(१२) वसुली अधिकारी यांनी निर्गमित करावयाच्या नोटीस/ आदेश/ घोषणापत्र यामध्ये त्यांना अधिकार प्रदान केलेल्या या आदेशाचा संदर्भ नमूद करावा.

(१३) संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी/ मॅनेजर/ व्यवस्थापक/ अवसायक यांनी प्रपत्र ४ मध्ये वसुली अधिकारीनिहाय वसुली कामकाजाचा आढावा दर सहा महिन्यांनी या कार्यालयास सादर करावा.

(१४) सर्व प्रकरणामध्ये जंगम जप्ती, स्थावर जप्ती, अपसेट प्राईज मंजुरी, जाहीर लिलाव व कलम १००/८५ अन्वयेची कार्यवाही ही नियमानुसार विहित मुदतीत पूर्ण करण्यात यावी. विहित मुदतीत उक्त कार्यवाही पूर्ण न केल्यास आपणांस दिनांक १ एप्रिल २०२७ पासून पुढील कालावधीसाठी कलम १५६ चे अधिकार प्रदान करण्यात येणार नाही याची गांभीर्याने नोंद घ्यावी.

नाशिक,
दिनांक १५ एप्रिल २०२६.

**फयाज मुलाणी,**
जिल्हा उप निबंधक,
सहकारी संस्था, नाशिक.

## नागरी नेमणुका

**विभाग प्रमुख आणि इतर सर्व संबंधित अधिकारी यांना कळविण्यात येते की, राजपत्रित अधिकाऱ्यांच्या रजा, बदल्या, नेमणुका, शक्ती आणि त्यांच्या इतर वैयक्तिक बाबी यासंबंधीचे आदेश शासनाकडून राजपत्राच्या या भागात अधिसूचनांच्या स्वरूपात प्रकाशित केले जातात ; त्यामुळे वरील बाबीसंबंधी सर्व संदर्भ निकालात निघाले आहेत असे समजण्यात यावे. अशा अधिसूचनांमुळे त्यांच्या दुय्यम अधिकाऱ्यांची कार्यमुक्ती व तत्सम बाबी यासंबंधी आनुषंगिक आदेश काढणे आवश्यक असल्यास राजपत्र मिळाल्यानंतर त्यांनीच ते काढले पाहिजेत. कारण शासनाकडून इतर कोणतेही आदेश काढले जाणार नाहीत.**

## सार्वजनिक बांधकाम विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३० जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक ईएसटी-११२६/प्र.क्र.४७/प्रशासन-२.—श्री. संजय शामकांत देगांवकर, सहसचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग, मंत्रालय, मुंबई हे दिनांक ३० जून, २०२६ (म.नं.) रोजी शासन सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**प्रशांत शेलार,**
कार्यासन अधिकारी.

---

## अल्पसंख्याक विकास विभाग

हुतात्मा राजगुरू चौक, मादाम कामा मार्ग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२,
दिनांक ३० जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेवानि २०२६/प्र.क्र. ९२/का-१.—श्री. मनोज दत्तात्रय जाधव, सहसचिव हे दिनांक ३० जून २०२६ (म.नं.) पासून नियत वयोमानानुसार शासन सेवेतून सेवानिवृत्त होत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**डॉ. माधवी खोडे चवरे,**
शासनाचे सचिव.

## वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेनिवे-१४२६/प्र.क्र. १७/प्रशासन-१.—श्री. राजेश बाबुराव गावडे, कक्ष अधिकारी, वित्त विभाग हे दिनांक ३१ मे, २०२६ (म.नं.) रोजी शासन सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शुभांगी शिंदे,**
शासनाचे अवर सचिव.

---

## वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेनिवे-१४२५/प्र.क्र. ३५५/प्रशासन-१.—श्री. राजेंद्रकुमार सुरेश सोनावणे, कक्ष अधिकारी, वित्त विभाग हे दिनांक ३१ मे, २०२६ (म.नं.) रोजी शासन सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाले आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शुभांगी शिंदे,**
शासनाचे अवर सचिव.

---

## वित्त विभाग

मंत्रालय, मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मुंबई ४०० ०३२, दिनांक १ जून २०२६.

### अधिसूचना

क्रमांक सेनिवे-२०२५/प्र.क्र. २९८/प्रशासन-१.—श्रीमती माधवी दि. शेट्ये, सहायक संचालक, वित्त विभाग ह्या दिनांक ३१ मे, २०२६ (म.नं.) रोजी शासन सेवेतून नियत वयोमानाने सेवानिवृत्त झाल्या आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**शुभांगी शिंदे,**
शासनाचे अवर सचिव.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, SMT. MANISHA KUMBHAR.